# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ
मार्डी रोड, तपोवन जवळ, अमरावती ४४४ ६०२ मो.नं. ९९२२९३०१६६ दूरध्वनी क्र. ०७२१-२६६५९०३


क्र. संगाबाअवि/१२/**०७**/२०१८

दिनांक : ०६.०२.२०१८

प्रति,

प्राचार्य,
सर्व संबंधीत महाविद्यालय,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
**अमरावती.**

**विषय : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ फेंसींग (महिला) स्पर्धा २०१७-२०१८ रद्द झाल्याबाबत व त्यानुषंगाने प्रशिक्षण वर्ग स्थगित करण्याबाबत..**

संदर्भ : १) महात्मा गांधी विद्यापीठ, कोट्याम यांचे पत्र क्र. एसपीईएसएस./३/आयुटी-फेन्सींग/२०१७-२०१८ दिनांक ०६.०२.२०१८

२) क्रीडा व शा.शि.मंडळाचे पत्र क्र. SGBAU-12/492/2018 दिनांक २०.१२.२०१७

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांतर्गत तथा संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की,

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ फेंसींग (महिला) स्पर्धेचे आयोजन दिनांक १७.०२.२०१८ ते १९.०२.२०१८ या कालावधीत महात्मा गांधी विद्यापीठ, कोट्याम येथे होणार असल्याचे संदर्भ क्र. २ मधील दिनांक २०.१२.२०१७ चे पत्रानुसार कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने विद्यापीठाद्वारे फेंसींग (महिला) संघाचा प्रशिक्षण वर्ग दिनांक ०४.०२.२०१८ ते १३.०२.२०१८ या कालावधीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती येथे आयोजित करण्यात आला होता. परंतु **आयोजक विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या संदर्भ क्र.१ मधील दिनांक ०६.०२.२०१८ रोजीच्या पत्रानुसार फेंसींग (महिला) स्पर्धांचे आयोजन रद्द करण्यात आल्याचे कळविले आहे.**

तरी आपणास विनंती करण्यात येते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती **येथे दिनांक** ०४.०२.२०१८ ते १३.०२.२०१८ **या कालावधीत आयोजित करण्यात आलेला फेंसींग (महिला) संघाचा प्रशिक्षण वर्ग स्थगित करण्यात येत असून** त्याबाबतच्या सूचना सर्वसंबंधीत खेळाडूंना देण्यात याव्या व अखिल भारतीय विश्वविद्यापीठ, नवि दिल्ली यांच्याकडून नविन तारखा कळविण्यात आल्यानंतर प्रशिक्षण वर्गाचे आयोजनाबाबत आपणास कळविण्यात येईल.

आपला

(डॉ.अविनाश असनारे)
संचालक
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रतिलिपी** : १) डॉ.श्रीकांत अलोने, कला व वाणिज्य महाविद्यालय, राळेगांव
२) प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, राळेगांव
३) डॉ.एस.डब्ल्यु. खाडे, स्व. पुंडलिकराव गवळी कला व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर जैन.
४) प्राचार्य, स्व. पुंडलिकराव गवळी कला व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर जैन.
५) प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती

यांना माहिती तथा योग्य कार्यवाहीस्तव सादर -